# Department of Agronomy
## Dr. PANJABRAO DESHMUKH KRISHI VIDYAPEETH, AKOLA
## , (M. S.) 444 104


No. Agro/ Estt./ 1712(a) /2025 Date: 06/11/2025

# जाहीर सूचना

सूचित करण्यात येते कि, कृषीविद्या विभाग, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला या कार्यालयातील नादुरुस्त जुन्या जडवस्तू जशा आहेत त्या परिस्थितीत विक्री करिता रीतसर लिलाव प्रक्रीये द्वारे लिफ़ाफ़ाबंद खरेदी बोली दिनांक १७.11.२०२५ संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत मागण्यात येत आहेत. ज्यांची कमीत कमी अंदाजे किंमत रु. ४२६३६/- (बेचाळीस हजार सहाशे छत्तीस रुपये फक्त) असून सदर विक्री लिलाव है नियमाधीन प्रक्रीयाद्वारे करण्यात येत आहे. सदर रकमे पेक्षा कमी बोलीचे निविदा रद्द करण्यात येईल. लिलावातील जडवस्तू व यंत्रसामुग्री दिनांक १३.11.२०२५ सकाळी १०.०० ते दुपारी ४ वाजेपर्यंत आवलोकनास जशा आहेत त्या परीस्थितीत कृषीविद्या विभाग, पदव्युत्तर शिक्षण संस्था, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथे उपलब्ध राहतील. ज्या खरेदीदारांची किंमत जास्त असेल त्यांना प्राधान्य देण्यात येईल.

वरील लिलावात सहभागी होणाऱ्या व्यक्तीला लीफाफाबंद खरेदी बोली पाकीटासोबत अनामत रक्कम रु. १०००/- (एक हजार रुपये फक्त) भरावी लागतील, त्यानंतरच आपली लीफाफाबंद बोली स्वीकारण्यात येईल व दिनांक १८.11.२०२५ रोजी सकाळी १०.०० वा. विद्यापीठ स्तरीय लिलाव समिती समक्ष उघडण्यात येतील. लिलावाची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर संपूर्ण रक्कम जमा करूनच साहित्य उचलण्याची परवानगी देण्यात येईल याची नोंद घ्यावी. लीफाफाबंद बोली मध्ये अपेक्षित रक्कम नमूद न झाल्यास सदर प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार समितीला राहतील.

ज्या व्यक्तींची लीफाफाबंद खरेदी बोली अंतिम न झाल्यास अनामत रक्कम संबंधितांना रीतसर प्रक्रियेद्वारे परत करण्यात येईल, करिता जाहीर सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

लिलावाच्या अटी

1. साहित्य विकत घेणाऱ्या व्यक्तीकडे भंगाराचा शॉपअॅक्ट परवाना व आधार कार्ड तसेच पॅन कार्ड असणे आवश्यक आहे.
2. सरकारी परिसरात इमारतीची व इतर नुकसान झाल्यास लिलाव घेणाऱ्या व्यक्तीकडून योग्य ती भरपाई घेण्यात येईल.
3. लिलाव मंजूर वा नामंजूर करण्याचे अधिकार सक्षम अधिकार्यांनी कोणतेही कारण न दाखवविता राखून ठेवले आहे.
4. लीलावच्या वेळेस कोणीही हजर न राहिल्यास लिलाव रद्द करण्यात येईल.
5. बोली बोलणा-यास रूपये १०००/- अनामत रक्कम म्हणून कार्यालयास जमा करावी लागेल, त्याशिवाय बोली बोलता येणार नाही.
6. सर्वात जास्त बोली बोलणा-यास लिलाव रकमेच्या १० टक्के रक्कम ताबडतोब कार्यालयास जमा करावी लागेल.उर्वरीत ९० टक्के रक्कम दोन दिवसाच्या आत कार्यालयास भरून रितसर पावती घेउन सर्व सामान ताब्यात घ्यावे लागेल.
7. बोली मध्ये अपेक्षीत रक्कम कार्यालयास प्राप्त होत नसल्यास सदर प्रकिया रदद करण्याचे अधिकार लिलाव समितीस राहिल.
8. सर्वात जास्त बोली बोलणा-या व्यतिरिक्त इतर सर्वांची अनामत रक्कार ताबडतोब परत करण्यात येईल.

विभाग प्रमुख
कृषी विद्या विभाग,
डॉ. पंदेकृवि., अकोला